दिनांक 16/02/2024 (शुक्रवार) सायंकाळ

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध

## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

फिर्यादी पोहवा संदीप बाजनघाटे पोलीस स्टेशन अरोली हे आपल्या स्टाफसह दिनांक १५/०२/२०२४ चे १०.५० वा. दरम्यान स्टाफसह सरकारी वाहनाने पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलींग करीत असता एक ट्रॅक्टर क्र. एम एच ३६ एल २११७ मध्ये रेती भरीत आहे, अशी गोपनीय खबर मिळाल्याने सदर ठिकाणी पोलीस स्टेशन अरोली येथील स्टाफ यांनी नाकाबंदी केली असता चालक **आरोपी नामे – मंगेश टिकाराम माहुले, वय ३५ वर्ष, रा. नगरधन ता. रामटेक** यास सदर रेतीचा परवाना बाबत विचारले असता रेती वाहतुकीचा परवाना नाही असे सांगीतले. विना परवाना एक ट्रॅक्टर क्र. एम एच 36 एल 2117 मध्ये मसला नदीचे पात्रातुन रेती भरतांना मिळुन आल्याने ट्रॉलीमध्ये ०१ ब्रास रेती भरतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून १ ब्रास रेती ३०००/–रू. व ट्रॅक्टर व ट्रॉली किंमती ४,५०,०००/– असा एकुण ४,५३,०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि सहकलम ४८(८) महसुल अधिनियम सहकलम ४,२१ खान खनीज अधि १९५७ सहकलम ३ सार्व. सं. नु. प्र. अधि. १९८४ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार पोहवा श्याम पोकळे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे अरोली येथील ठाणेदार सपोनि. निशांत फुलेकर, पोहवा शाम पोकळे, संदीप बाजनघाटे यांनी पार पाडली.

## नागपूर (ग्रामीण) पोलीसांची अवैधरीत्या दारु विक्रेत्यांवर कारवाई

संपुर्ण नागपूर (ग्रामीण) जिल्हयातील पोलीस स्टेशन निहाय अवैधरीत्या दारु विक्रीबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा नागपूर (ग्रामीण), पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी घेतला असता यामध्ये एकूण दिनांक १५/०२/२०२४ रोजी एकूण १० केसेस अवैधरीत्या दारुची विक्री करणाऱ्या गुन्हेगारां विरुध्द दाखल करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये एकूण १० आरोपीतांविरूद्ध कारवाई करण्यात आली आहे. यात आतापर्यत ७०७०/— रु. चा माल जप्त करुन १२९६० मिली लिटर देशी दारु, ३५ लिटर मोहाफुल दारु कार्यवाहीमध्ये जप्त करण्यात आलेली आहेत.

मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी अवैधरीत्या दारुची विक्री करणाऱ्यां विरुध्द प्रत्येक पोलीस स्टेशन अंतर्गत सतर्कपणे पेट्रोलींग व नाकाबंदी करुन कडक कार्यवाही करण्याबाबत सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व ठाणेदार यांना आदेश देण्यात आलेले आहेत.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन येथील ठाणेदार पोस्टे जलालखेडा, केळवद, रामटेक, खापरखेडा, काटोल, नरखेड, कन्हान व त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर